<u>प्रेसनोट –</u>

दत्तवाडी पो.स्टे.पुणे
दिं. २५/०५/२०१८

## दोन सराईत वाहनचोरांना दत्तवाडी पोलीसांनी केले जेरबंद त्यांचेकडुन तीन चोरीच्या दुचाकीही केल्या जप्त

दिं. २४/०५/२०१८ रोजी दत्तवाडी पो. स्टे. कडील पो शि विकास कदम व पो शि सागर सुतकर यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, "दोन इसम हे त्यांचेकडे असणारी राखाडी काळया रंगाची नंबर नसलेली होंडा कंपनीची ॲक्टीवा 5G गाडी ही विकण्यासाठी लक्ष्मीनारायण थियेटरजवळ पर्वतीदर्शन येथे आले आहेत. त्यातील एकाने त्याचे अंगात निळया रंगाचा गोल गळयाचा हाफबाह्याचा टिशर्ट व स्काय ब्ल्यु कलरची जीन्स पॅन्ट घातली आहे तसेच तो रंगाने काळा असुन त्याचे केस वाढलेले आहेत व दुस-याने त्याचे अंगात गडद काळया रंगाचा गोलगळयाचा फुलबाहयाचा टिशर्ट व फिक्कट काळया रंगाची जीन्स पॅन्ट घातलेली असुन त्याचे केस माथ्यावरती वाढलेले असुन तो रंगाने काळा आहे. त्यांचेजवळ असणारी ॲक्टीवा गाडी ही चोरीचीच असावी" अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने ती वरिष्ठांना कळवुन त्यांचे परवानगीने पोलीस उपनिरिक्षक डफळ यांनी स्टाफ व पंचासह तत्काळ लक्ष्मीनारायण थियेटरजवळ पर्वतीदर्शन येथे गेले असता तेथे स्नॅक सेंटरजवळ वरील वर्णणाचे दोन इसम वरील वर्णनाचे गाडीवर बसलेले दिसल्याने पोलीसांनी त्यांना १७/०० वा. जागीच पकडले त्यांना त्यांची नावे व पत्ते विचारता त्यांनी आपली नावे १) उमेश वसंत जंगम वय २२ वर्षे धंदा काहीनाही रा. गल्ली नं. ४६, जनता वसाहत पुणे व २) तेजस ऊर्फ मॉन्टी माणिक खराडे वय. २० वर्षे धंदा. काहीनाही, रा. गल्ली नं. ५८, जनता वसाहत पुणे अशी असल्याची सांगीतली त्यावेळी पोलीसांनी त्यांचेकडे चौकशी केली असता ती गाडी त्यांनी जनता वसाहत येथील गल्ली नं. ४३, गणेश मित्रमंडळासमोरुन चोरुन आणलेली आहे असे सांगितल्याने पोलीसांनी सदर गाडीचा चासी व इंजिन नंबरवरुन तिचा ओरिजनल आर टी ओ नंबर एम एच १२ क्यु जे ७५४४ हा काढला व त्यानंतर गाडी चोरीस गेलेल्या ठिकाणावरुन व तिचे आर टी ओ नंबरवरुन दत्तवाडी पोलीस स्टेशन कडील अभिलेखाची पडताळणी केली असता सदर राखाडी काळया रंगाची होंडा कंपनीची ॲक्टीवा 5G गाडी क्र. एम एच १२ क्यु जे ७५४४ ही चोरीला गेल्याची तक्रार दि. २०/०५/२०१८ रोजी दत्तवाडी पोलीस स्टेशन गु. र. नं. २०३/२०१८ भा. द. वि. कलम ३७९ प्रमाणे दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे दाखल असल्याने सदर आरोपींना दाखल गुन्हयात दि. २४/०५/२०१८ रोजी १८/३० वाजता अटक करण्यात आली असुन अटक मुदतीत त्यांचेकडे अधिक तपास केला असता त्यांनी आणखी एक हिरोहोंडा कंपनीची स्प्लेंडर गाडी क्रमांक एम एच १२ बी झेड ५०८९ व एक होंडा कंपनीची युनिकॉर्न गाडी क्रमांक एम एच २९ ए. ई. ९८५० या दोन मोटारसायकल चोरल्या असल्याचे सांगुन त्या लपवुन ठेवलेल्या ठिकाणावरुन काढुन दिल्या आहेत तसेच त्याबाबत अनुक्रमे सिंहगड पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २१३/२०१८ भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे व वारजे माळवाडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ११८/२०१८ भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हे दाखल आहेत. अशाप्रकारे आरोपींकडुन एकुण ०३ चोरीच्या दुचाकी जप्त करण्यात आल्या असुन पोलीस त्यांचेकडे अधिक तपास करीत आहेत. सदरची कारवाई ही मा. डॉ. प्रविण मुंढे मा.पोलीस उप-आयुक्त सो परि-२, मा. डॉ शिवाजी पवार सहा.पोलीस आयुक्त सो, स्वारगेट विभाग पुणे शहर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) कृष्णा इंदलकर सो यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक श्री डफळ, पो. हवा. तानाजी निकम, पो. हवा. रविंद्र फुलपगारे, पो. ना. सुधीर घोटकुले, पो. ना. महेश गाढवे, पो शि विकास कदम, पो. शि. सागर सुतकर, पो शि रोहन खैरे, व पो. शि. राहुल ओलेकर, पो शि शरद राऊत, पो शि शिवाजी क्षीरसागर यांनी केली आहे. तसेच दाखल गुन्हयाचा पुढील तपास पोलीस पोलीस उपनिरिक्षक अनिल डफळ हे स्वतः करीत आहेत.